# स्वरसम्राट

स्टेजवरील निळ्या पडद्यावर देवी शारदेचे वीणावादन करीत असलेले चित्र अन् त्यासमोरची शुभ्र भारतीय बैठक. पांढरे शुभ्र तक्ते. दोन तंबोरे - आडवे ठेवलेले. तबला अन् डग्गा. उदबत्त्यांचा सुवास स्टेजवर अन् समोरच्या शामियान्यात दरवळलेला. स्पीकरवरून मंद सुरात चाललेले सनईवादन. शामियान्यात हळूहळू जमा होऊ लागलेला विविधरंगी रसिक श्रोत्यांच्या संमिश्र कोलाहलात मिसळून तयार झालेले एक उत्कंठापूर्ण, तरल वातावरण. स्टेजवरच्या प्रखर अन् शामियान्यातील मंद उजेडात कार्यकर्त्यांची ह्या वातावरणाला भंग न करणारी धावपळ. पंडितराव अजूनपर्यंत न आल्यामुळे पडलेल्या चिंतेचं सावट लपविण्याचं चालू असलेलं नाटक....

ह्या सर्वांपासून दूर लॉजवरील आपल्या खोलीत पंडितराव एकटे बसले होते. मद्याचे पेले पोटात रिचवीत. ''रागीणी मला माफ कर'' असं पुटपुटत. समोर टांगलेल्या एका तरुण स्त्रीच्या छायाचित्राकडे याचनेच्या दृष्टीने बघत.... अश्रुयुक्त चेहऱ्याने ! अगतिकपणे ! त्यांच्या पर्सनल असिस्टंटच्या अस्वस्थ चुळबुळीकडे दुर्लक्ष करीत....

पंडितरावांचा पर्सनल सेक्रेटरी आनंद नेहमी ह्या सुमारासच अस्वस्थ व्हायचा. पंडितरावांचं बेसुमार पिणं त्याला अस्वस्थ करायचं. कोड्यात टाकायचं. एवढा मोठा अखिल भारतीय कीर्तीचा, शासन गौरवित, लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ होऊन रसिकांच्या मनावर गेले एक तप हुकुमत गाजवणाऱ्या ह्या गायकाचं दर बैठकीच्या आधीचं हे वर्तन त्याला नेहमी अचंब्यात टाकी. चिंतेनं त्याचं हृदय व्याकूळ होई. 'अति पिण्यामुळे बुवा बैठक बिघडवणार तर नाही ना ?' ह्या विचारानं दर बैठकीच्या आधी त्याच्या जीवात जीव राहात नसे. त्यांना कसंबसं स्टेजवर नेऊन बसवलं, त्यांच्या हाती तंबोरा देऊन एकदा त्यांनी षड्ज लावला, अन् त्यांचा एकदा मनाजोगता सूर लागला की त्याचा जीव भांड्यात पडत असे. 'आजची बैठक बुवांच्या कीर्तीप्रमाणेच यशस्वी होणार, रंगणार' याची खात्री तो षड्ज ऐकल्यावर त्याला होत असे. अन् नवल असं की, अजूनपर्यंत एकदाही बुवांची मैफल बिघडली नव्हती. बैठक आटोपल्यावर तृप्त मनानं श्रोते बुवांच्या गायनाची मुक्त कंठानं तारीफ करीतच परतत होते.

अन् तरीही दर बैठकीपूर्वी ही वेळ झाली की आनंद अस्वस्थ व्हायचा.

कोड्यात पडायचा. बुवांचं अप्रतिम गायन अन् हे बेसुमार पिणं ह्यातील परस्पर संबंधाचा मेंदूचा भुगा होईपर्यंत विचार करायचा.

पण दोन तपांपासून त्यांच्यावर सतत होत आलेल्या आघातांचा इतिहास आनंदला माहीत होण्याचा सुतराम संभव नव्हता. कारण मनाच्या चोरकप्प्यात दडवून ठेवलेला तो भूतकाळ पंडितराव कधीच उघडा करणार नव्हते – कुणाजवळच नव्हते – हां ? आज रागिणी असती तर ! अन् ती असती तर तिला सांगावेहीक लागले नसते. तीच त्यांच्या मनातली व्यथा अचूक ओळखायची अन् तीवर मायेची फुंकर घालायची – पुढची वाटचाल करायला उत्साहित करायची. मनाला उमेद आणायची.

म्हणूनच वयाच्या बाराव्या वर्षी संगीताच्या नादानं झपाटलेला अन् म्हणूनच घरातून अंगावरच्या कपड्यानिशी पळून गेलेल्या पोराला आपल्या मायेची पाखर घालून ह्या पदापर्यंत पोहोचवणाऱ्या रागिणीच्या आठवणींनी पंडितराव व्याकूळ होत.

घरातून पळून जावं लागल्याचं छोट्या पंडितला फारसं कधी वाईट वाटलचं नव्हतं. कर्मठ, सनातनी ब्राह्मणाच्या घरात जन्माला आलेल्या मुलाचं हे संगीत शिकण्याचं वेड व त्यासाठी हुसेनखाँ सारख्या मुसलमान गायकाचा गंडा बांधण्याचा हट्ट पुरवला जाण्यासारखा नव्हताच. अन् घरातून पळून जाण्याचा मार्ग म्हणूनच त्यानं जाणूनच पत्करला होता.

लहानपणापासूनच गाण्याची अत्यंत आवड असलेल्या छोट्या पंडितला एकदा त्याच्या मामानं हुसेनखाँच्या गाण्याला सहज नेलं होतं. ते खाँसाहेबांचे गाणं कानावरून गेलं, अन् छोट्या पंडितचं डोकं झपाटलं. दहा कोसावरील तालुक्याच्या गावात मुक्कामाला असलेल्या "खाँसाहेबांना भेटण्यासाठी पंडित अनवाणी रखडत निघाला. खाँसाहेब आपल्याला ठेवून घेतील, ह्या आशेवर ! आपल्या शिष्यवर्गात सामावून घेतील, ह्या खात्रीनं ! आपल्याला संगीताची दीक्षा देतील या विश्वासानं !.... अन् पहिला आघात झाला तो इथंच.

चांदीच्या पानाचं तबक समोर ठेवलेलं. हुक्याची नळी हातात धरलेली. आजुबाजूला काही शिष्य आणि श्रोते ह्यांच्या समवेत हास्यविनोदात रंगलेले खाँसाहेब, मध्येच एखाद्या अनवट रागाची सुरावट खुलवून सांगत असतानाच छोट्या पंडितनं तिथं अपेक्षेनं काठोकाठ भरलेल्या मनानं प्रवेश केला. खाँसाहेबांनी त्याच्याकडे भिवया उंचावून प्रश्नार्थक पाहिलं, अन् छोट्या पंडितनं आपली

मनात बाळगलेली मनिषा उघड केली. त्यावर खाँसाहेब आपल्या भरदार दाढीवरून हात फिरवत उद्‌गारले, ''वा ! वा ! क्यों नही बेटा ! जरूर सिखायेंगे. तुझे इतनी लगन है गानेसे और हम इन्कार करेंगे ये कैसे हो सकता है ? लेकीन कुछ गा के तो बताओ ! शरमाना नही !''

कृतज्ञ होऊन पंडितनं खाँसाहेबांच्या चरणी मस्तक ठेवलं अन्‌ नंतर त्यांच्याच मैफलीत त्यांनीच गायलेलं एक भजन म्हणण्यास प्रारंभ केला. अतिशय तन्मयतेने तो गाऊ लागला. मनात आनंदाची कारंजी थुईथुई नाचू लागली. डोळे अर्धोन्मिलीत झाले –

पण सुरुवातीला उत्सुक असलेला खाँसाहेबांचा चेहरा उत्तरोत्तर भावविहीन होत गेला. तटस्थ झाला. अतिशय कोरड्या सुरात त्यांनी छोट्या पंडितला सांगून टाकलं, ''बेटा ! गाना तेरे नसीब में नही ! अल्लाने तेरे गले मे सूर पैदाहि नहि किये !! तू घर लौट जा !''

ऐन भरात आलेलं सतारवादन अचानक तार तुटून खंडीत झाल्यानं सतार वादकाच्या मनाची जशी अवस्था व्हावी तशी स्थिती पंडितच्या मनाची झाली. त्याच्या डोळ्यासमोर अंधार दाटून आला. पापण्या अश्रुंनी डबडबल्या. खाँसाहेबांचे पाय धरून त्यानं विनवणी केली. त्याला दूर न लोटण्याची – शिष्य म्हणून नसेल तर एक सेवक म्हणून जवळ राहू देण्याची.

खाँसाहेबांना त्याची दया आली असावी. किंवा इतर काही कारणांनी म्हणा पण त्यांनी त्याची व्यवस्था लावली. ते ज्या नाटक कंपनीत होते तिथंच – कंपनीच्या मालकांना खाँसाहेबांना नाही म्हणायचं धैर्य होऊ शकलं नव्हतं. त्यांच्या सर्व संगीत नाटकांची मदार खाँसाहेबांवर अवलंबून होती. त्यांची लहर सांभाळणं त्यांना भागच होतं. शिवाय कंपनीत जसे हरकामे नोकर हवेच असतात. दोन वेळच्या जेवणावर. कधीकधी कपड्यालत्त्यासाठी चार पैसे देण्यावर.

छोटा पंडित मात्र खूष होता. नाटक कंपनीबरोबर गावोगाव पाहण्यात, निरनिराळी प्रेक्षणीय स्थळं पाहण्यात, नाट्यकलेच्या बहुरंगी नि बहुढंगी जीवनाचा आस्वाद घेण्यात, निरनिराळ्या नाटकांचे प्रयोग पाहण्यात. अन्‌ मुख्य म्हणजे खाँसाहेबांच्या गायनाचा मनसोक्त आस्वाद घेण्यात – त्यासाठी तो पहाटेसच उठायचा अन्‌ खाँसाहेबांचा रियाझ ब्राह्ममुहूर्तावर सुरू झाला की तो चोरून ऐकायचा – ऐकलेलं गळ्यातून उमटवण्याचा प्रयत्न करायचा. गावाबाहेरच्या एकांतात. एखाद्या वृक्षाखाली, देवळात, नाहीतर नदीकाठी. खाँसाहेबांना त्यानं

मनोमन गुरु मानलं होतं, अन् त्यांच्यासारखा मोठा गायक व्हायचं ध्येय त्यानं सोडलं नव्हतं. नाटकाच्या विश्वात असूनही, नट वगैरे व्हायचं त्याच्या मनात येत नव्हतं - गायकनट सुद्धा !

अन् त्यामुळेच कंपनीतल्या कुणालाही पंडितच्या गायन कलेतील तपस्येची कल्पनाही नव्हती - खुद्द त्याच्या गुरुलासुद्धा. कंपनीतला नोकर याशिवाय इतर कोणत्याही नात्यानं त्याच्याकडे कुणीच बघत नव्हते. खुद्द खाँसाहेबांचे दोन पट्टशिष्य - ज्यांना 'खाँ' आपल्या गायकीचे भावी वारस समजत होते त्यांनाही पंडितच्या रहस्याचे आकलन झालेले नव्हते. पंडित तसा फार काटेकोरपणे वागत होता. अंगी आत्मविश्वास पूर्ण बाणल्याशिवाय तो काहीच उघड करणार नव्हता. खाँसाहेबांनी त्याला पहिल्या भेटीत जे सुनावले होते ते त्याच्या काळजावर कोरले गेले होते. ते मिटविण्यासाठी त्याची तपस्या चालू होती. एकांतात, अविश्रांत, कठोर !

अन् त्याच्या तपस्येला आता एक तप होऊ लागले होते. पंडितचे आता वीस बावीस वर्षाच्या तरुणात रूपांतर झाले होते. निसर्गाने आपले काम बजावले होते. पण अजुनही त्याच्या मनात आत्मविश्वास उत्पन्न झाला नव्हता - अन् कधीकाळी झाला असता किंवा नाही याची शंकाच होती.

जर ह्या सुमारास रागिणीनं त्याच्या जीवनात प्रवेश केला नसता तर !

भव्य भालप्रदेश, निळसर टपोरे भावूक डोळे, चाफेकळी नासिका, शेलाटा बांधा, काळाकुरळा नितंबापर्यंत रूळणारा केशकलाप अन् केतकी वर्ण अशा रागिणीची गाठभेट त्याच्या नागपूर मुक्कामी त्यांच्याशी झाली. तीही मोठ्या योगायोगानंच !

नागपूरला त्याच्या कंपनीचा मुक्काम बरेच दिवस लांबला होता. त्यावेळची ती गोष्ट. खाँसाहेबांचा सकाळचा रियाझ ऐकून ते सूर मनात घोळवितच पंडित दुपारच्या सुमारास दूरवर असलेल्या महाराजबागेत आला. एक एकांत स्थळ पाहून त्यानं बैठक मारली. गायनास सुरुवात केली. खाँसाहेबांनी पहाटेस गायलेल्या 'बैरागी भैरव' ची नक्कल सहीसही करण्यास तो अगदी तन्मय होऊन गेला. त्याचं देहभान हरपलं. काळाची समाधी लागली....

गायन संपवून पंडित आता उठणार इतक्यात एक तरुणी समोरच्या झाडामागून पुढे आली अन् ओळख नसतानाही तिनं पंडितच्या गायनाची मुक्त कंठानं तारीफ सुरू केली.

पंडित संकोचला. महाराजबागेतलं ते एकांत स्थळ. भर दुपारची वेळ. आजुबाजूला चिटपाखरू नाही. अशावेळी एक सुंदर तरुणी इथं येते काय ! ती आपलं गायन चोरून ऐकते काय ! अन् परिचय नसताना आपली तारीफ सुरू करते काय ! साऱ्याच गोष्टी त्याला स्वप्नवत् वाटू लागल्या.

तिचं नाव रागिणी आहे. आपल्या नाटक कंपनीत नागपूर मुक्कामात तिला दुय्यम नटी म्हणून नुकतंच नोकरीत ठेवलेलं आहे. अन् नाटकातील आपल्या भूमिकेचे संवाद अभिनयासहित घटविण्यासाठी तीहि पंडितसारखी एकांत स्थळ म्हणून इथं आली असताना तिच्या कानावर पंडितच गाणं पडून ती मंत्रमुग्ध झाली इत्यादी गोष्टी नंतर तिच्याकडूनच त्याला कळल्या. पण त्यावेळी मात्र तिच्या प्रश्नांना पंडित काहीच उत्तर देऊ शकला नाही. त्याची वाचाच बंद पडल्यासारखी झाली होती. तिलाच काय पण कंपनीतल्या कुणालाच तो फारसा ओळखत नव्हता. स्वत:बद्दलच्या न्यूनगंडामुळे तो एकलकोंडा झाला होता अन् त्यामुळे खाँसाहेबांचं घर अन् आपली खोली याशिवाय इतर जग त्याला अपरिचित होतं. त्याशिवाय त्याच्या जीवनात कुठं न्यूनही पडलं नव्हतं. कंपनीत प्रतिष्ठा पावलेल्या नटनट्यांना व इतर कलावंतांना पंडितची मैत्री करून घ्यावीच अशी काही आवश्यकता वाटण्याचा प्रश्नच नव्हता. खुद्द खाँसाहेबांना देखील पंडित नावाचा कुणी आपला शिष्य असेल याची जाणीव नव्हती. त्यांचे दोन प्रमुख गायक नट ह्यांना आपल्या गायकीची संथा देण्याचे व आपले घराणे पुढे चालविणारे वारस म्हणून आशा बाळगून असण्यात ते मग्न होते. ह्या सर्व परिस्थितीत पंडितला रागिणी माहीत असण्याचं कारणच नव्हतं....

पंडित सद्‌गदीत झाला. आजवर त्याची कोणी इतकी स्तुती केली नव्हती. गौरव केला नव्हता. गदगदलेल्या स्वरात तो एवढंच बोलला –

"धन्यवाद ! एक विनंती ! कुणाजवळ काहीएक बोलू नका. हे गुपित आपल्याजवळच राहू द्या.... कृपा करून...."

पंडितरावच्या पी.ए.नं त्यांना त्यांच्या समाधीतून बाहेर आणलं तेव्हा त्यांच्या आठवणींची साखळी तुटली. कार्यक्रमाची वेळ होत आली होती. हॉलवर जायला हवं होतं, ते उठले अन् तोल सावरत जीना उतरून त्यांना न्यावयास आलेल्या मोटारीत जाऊन बसले. आनंद समोर बसला. मोटार सुरू झाली. गार वाऱ्याची झुळूक त्यांच्या अंगाखांद्यावर खेळू लागली. त्यांनी डोळे मिटले. आणि पंडितराव पुन्हा आपल्या समाधीत शिरले – त्यांच्या नकळत.

रागिणी गुपित राखू शकली नव्हती. पंडितवर होत असलेला अन्याय ती सहन करू शकली नव्हती. कारण तिचा त्याच्यावर जीव जडू लागला होता. त्याचा सरळ, निष्कपट स्वभाव, साधी राहणी, झिडकारलेला असून सुद्धा त्याची त्याच्या गुरुवर असलेली अढळ श्रद्धा नि गायनकलेवरची त्याची अढळ भक्ती !.... ती मोहून गेली या गुणांवर !

रागिशीचं प्रेम पंडितच्या जीवनावरही अमृताचं सिंचन करून गेलं होतं. अतिशय आत्मविश्वासनं तो आपल्या कलेत प्रगती करत होता. रागिणी त्याचं जीवनसर्वस्व बनली होती.

पण अजून गुरुसमोर जाण्याचीत याची हिंमत होत नव्हती. साहेबांचे ते शब्द त्याच्या कानात प्रतिध्वनी सारखे घुमत – 'तेरे गले मे अल्ला ने सूर पैदाहि नही किये !'

रागिणीला तो हे सांगायचा अन् दुःखाने विचारायचा, "रागिणी, ईश्वरानं माझ्या गळ्यात सूर भरले नाही – मग डोक्यात हे गायनाचे वेड भरवून का असा छळ मांडलाय माझा ? का ?"

एका पहाटेच्या समयी नाशिकला गोदावरीच्या तीरावर रामाच्या मूर्तीसमोर पंडित असाच गात बसला होता. 'जोगियाचे' करूण स्वर पहाटेच्या शांत वातावरणात भरून होते. पंडितचे देहभान हरपले होते. डोळ्यांतून अश्रुंच्या धारा वाहत होत्या. तंबोऱ्यावरून बोटं थरथरत होती. स्वरात विचारणा होती – "कां ? परमेश्वर कां ? कां ही आस ?"

अन् एकाएकी एक प्रेमळ, गदगदलेल्या स्वरात साद ऐकू आली, "बेटा पंडित ! उठो ! आओ, हमारे गले लगो !" पंडितचे डोळे उघडले. त्यानं पाहिलं.

समोर खाँसाहेब, त्याचा साक्षात गुरु ! डोळ्यातून झरझर अश्रूपात होत आहे अशा अवस्थेत, हात पसरून उभे !

एकच क्षण पंडित थिजल्यासारखा झाला. एकच क्षण ! दुसऱ्याच क्षणी तो उठला अन् आपल्या गुरुच्या पायावर त्यानं लोळण घेतली. अश्रुंनी त्यांचे पाय भिजवीत त्यानं त्यावर मस्तक ठेवलं. त्याच क्षणी खाँसाहेबांनी त्याला उठवलं. छातीशी घट्ट धरलं. त्यांचा हात त्याच्या पाठीवर वात्सल्यानं फिरू लागला. पंडितनं पाहिलं. रागिणी मिष्किलपणे हसत मागं उभी होती....

समारंभाचे अध्यक्ष दाराजवळ हार घेऊन हसऱ्या चेहऱ्यानं उभे होते.

पंडितराव प्रवेशद्वाराजवळ येताच त्यांनी त्यांच्या गळ्यात हार घातला अन् त्यांचा हात धरून ते त्यांना आत हॉलमध्ये घेऊन गेले. समारंभ सुरू होण्यापूर्वी मंडळाच्या कार्यकारी सभासदांबरोबर ''कॉफी-पान'' होणार होते. टेबलवर शुभ्र टेबलक्लॉथ अंथरलेला होता. फ्लॉवरपॉटमध्ये फुलांचा गुच्छ ठेवलेला होता. पंडितरावांचं लक्ष सहज समोर गेलं. समोरच्या भिंतीवर नामवंत गायकांचे पोर्टेट लागले होते. अन् त्यात त्याचाही एक पोर्टेट होता. अन् खाली पदवी होती ''स्वरसम्राट!''

लालभडक ज्वाला त्या अक्षरांतून वर उफाळत आहेत असा भास पंडितरावांना झाला. ते खुर्चीत थरथरत बसले. चेहऱ्यावरचा घाम रूमालाने टिपू लागले....

''अखिल भारतीय गायन परिषदेत खाँसाहेबांनी आपल्या तीनही शिष्यांना गायनासाठी आणलं होतं. आपल्या घराण्याचा वारसा चालवणारे पुत्र या भावनेतून ते त्यांच्याकडे पाहात होते. खाँसाहेबांचे पूर्वीचे दोन पट्टशिष्य वरवर पंडितशी चांगले वागत होते. पण आतून मात्र मत्सरानं पेटून उठले होते. कारण खाँसाहेब आजकाल पंडितची फार तारीफ करू लागले होते, त्याला समोर बसवून गायनातील बारकावे समजवून सांगण्यात तासन्तास खर्चत होते. त्याच्या मेहनतीची, कौशल्याची तोंडभरून तारीफ करीत होते - हरवलेलं मूल परत सापडल्यावर त्यावर कांकणभर अधिकच माया करणाऱ्या मातेप्रमाणे 'खाँ' वागत होते. अन् ह्या गोष्टीचाच त्या दोघांना मत्सर वाटत होता.

परिषदेला पंडितलाही आणण्याचा खाँसाहेबांचा हट्ट म्हणजे कळसच होता. त्यांना म्हातारचळ लागला असं कंपनीतील सर्वांना वाटू लागलं होतं. एक रागिणी सोडून ! पंडितच्या गायन कौशल्याची कुणाला जाणीव झाली नव्हती.

पंडित मात्र कशातच नव्हता. खाँसाहेबांनी आपल्यावर छत्र धरलं एवढ्या समाधानातच तो तृप्त होता. रागिणीनं केलेल्या उपकारांचा तो ऋणी होता. आपल्या कलेच्या आराधनेतं धुंद होता.... परिषदेत दर रात्री होणाऱ्या नामवंत गायकांच्या गाण्यांनी उद्‌भवलेल्या सुरांच्या साम्राज्यात विहार करीत होता. त्याच्या स्वत:च्या गायनाच्या कार्यक्रमाचा दिवस जवळ येत होता. पण त्याची त्याला शुद्ध नव्हती.

अखेर तो दिवस उजाडला ! पण एक अशुभ वार्ता घेऊनच ! रागिणी अपघातात ठार झाली होती ! मुंबईला ! एका बस अपघातात !

सकाळी तोंड धुऊन लॉजच्या गॅलरीत चहाची वाट पाहात उभ्या असलेल्या पंडितच्या हातात तार देऊन पोस्टमन निघून गेला होता...

चहा घेऊन वर आलेल्या वेटरला पंडित गॅलरीत बेशुद्ध होऊन पडलेला दिसल्यावर एकच धावपळ उडाली. पंडित बराच वेळ बेहोषीतच होता. शुद्धीत आला तेव्हा त्याची वाचाच बसल्यासारखी झाली होती.

खाँसाहेबांनी त्याच्या पाठीवर मायेनं हात ठेवला, तसा हंबरडा फोडून तो रडू लागला. त्याला आवरणं साऱ्यांना अशक्य झालं. कोणत्या मुर्खानं आजच्याच दिवशी ही तार पाठवली असं ज्याच्या त्याच्या मनात येऊ लागलं. तो बैठकीत गाऊ शकेल असं कुणालाच वाटेना.

संध्याकाळचे सात वाजले. पंडित आपल्या कॉटवर अंधारातच सुन्न बसून होता. सुस्कारे टाकीत, हुंदके देत. रागिणीची आठवण काढीत. खाँसाहेब त्याच्या खोलीत आले. बटन दाबून त्यांनी उजेड केला. जवळ गेले. पाठीवर हात ठेवत म्हणाले –

''उठो बेटा ! चलना है ! आज तुम्हारा पहला गाना है ! तय्यारी करो !!

''गायचं आहे ? खाँसाहेब ? मी गाऊ शकेन आज ?.... रागिणी गेली आणि मी गाणं म्हणू ? गाता येईल मला ? सूर उमटतील गळ्यातून ?... पंडित वेड्यासारखे प्रश्न विचारू लागला. उसासू लागला.

''गावं लागेल बेटा ! तुझे गाना पडेगा ! मेरे लिए ! मेरे गाने के लिए ! मेरे घराने की इज्जत बचाने !

''पण माझी रागिणी.'' पंडित मध्येच उद्‌गारला. त्याला अडवत खाँ म्हणाले.

''हाँ बेटा ! रागिनी चली गयी ! लेकिन उसकी तमन्ना यही थी की तू बडा गायक बने ! उसकी ख्वाईश तुझे पुरी करनी पडेगी ! तुझे आज गानाही पडेगा. उसकी रूह तुझे गाता देखने के लिए तरस रही होगी.

पंडितनं खाँसाहेबांच्या नजरेत डोकावून पाहिलं. खोलवर. अन् नंतर एकेका शब्दावर जोर देत तो म्हणाला –

मी आज गाणार ! खाँसाहेब ! आपल्याकरिता. रागिणीसाठी माझ्या कलेची पूजा बांधायची आहे मला.''

खाँसाहेबांच्या डोळ्यात अश्रू तरारले. चेहऱ्यावर समाधान पसरले.

त्या रात्री पंडित गायला. इतक्या तयारीनं की त्यानं सारी सभा जिंकून घेतली. सारे श्रोते मंत्रमुग्ध होऊन गेले. जाणकारांनी पंडितच्या गाण्याला दाद दिली. हुसेनखाँच्या गायकीचा वारस म्हणून साऱ्यांनी त्याला पावती दिली. परिषद भरविणाऱ्या तज्ज्ञ परीक्षकांनी त्याला स्वरसम्राट ही पदवी देऊन त्याचा गौरव केला. पंडितनं आपल्या गुरुच्या चरणांना वंदन करून भैरवी आळवली तेव्हा सारा मंडप करूणोदात्त रसानं भारून गेला. हुसेनखाँसाहेबांच्या वृद्ध चेहऱ्यावरून आनंदाश्रू वाहू लागले.

त्यांच्या घराण्याची गायकी पुढे चालवणारा वारस त्यांना मिळाला होता !

दुसऱ्या दिवशी पंडित तडक मुंबईला परतला पण रागिणीचं शेवटचं दर्शन त्याला होऊ शकलं नाही. एक स्वरसम्राट तिचा एक फोटो घेऊन भग्न मनानं आपल्या खोलीत परतला.

काळ झपाट्यानं पुढं चालला होता. स्वरसम्राट पंडितबुवा याचं नाव साऱ्या भारतभर प्रख्यात झालं होतं. ठिकठिकाणाहून त्यांना गायनाच्या कार्यक्रमाची निमंत्रणं येत होती. प्रत्येक कार्यक्रम बुवा गाजवून सोडत होते. संगीताच्या दुनियेचे पंडितबुवा आता अनभिषिक्त सम्राट गणले जाऊ लागले होते. रसिकांच्या मनांवर ते राज्य करू लागले होते. बारा वर्षे.

त्यांच्या यशाची चढती कमान पाहात पाहात खाँसाहेबांनी कृतार्थ होऊन डोळे मिटले. तेव्हाच नाटक कंपनीचा संबंधही तुटला. त्यांच्या आनंद नावाच्या सेक्रेटरीने त्यांची चोख व्यवस्था ठेवायला सुरुवात केली होती.

रागिणीच्या वियोगाच्या दुःखावर केव्हाच खपली धरली होती. आता पुसटसा व्रण राहिला होता. तिच्या फोटोला रोज हार घालणं हा एक नित्य नियम झाला होता इतकचं. बाकी बुवा आपल्या ऐश्वर्यात, मान मरातबात मशगुल होऊन गेले होते. भोवताली जमलेल्या स्तुतिपाठकांच्या प्रशंसेत पडले होते. बारा वर्ष, एक तप !!

अन् अशातच ते एकदा नागपूरला आले होते. स्टेशनवर पाय ठेवल्यापासून त्यांना जुन्या आठवणी येऊ लागल्या. रागिणीची प्रथम भेट नागपूरलाच झाली होती हे त्यांना आठवले. क्षणभरच ते अस्वस्थ झाले. भूतकाळात शिरले त्याच झटक्यात एकटेच महाराजबागेत निघाले, झपाटल्यासारखे -

महाराजबागेतील त्या जुन्या एकांतस्थळी येऊन बसताच सायंकाळच्या

धुसर प्रकाशात बुवांना भास झाला. रागिणीचा ! समोरच्या झाडीमधून ती पुढे आली. पांढऱ्या कपाळानं, पांढऱ्या साडीत, मोकळ्या केसानं ! चेहऱ्यावर खिन्न भाव, डोळ्यात अपार दुःख. ती काहीच बोलत नव्हती. त्यांच्याकडे नुसती बघत होती. एकटक.

पण पंडितरावच्या मनावर तिचे बोल उमटत होते –

"पंडित ! तू वाहावलास ! आपल्या कलेपासून दूर गेलास. बारा वर्षांपूर्वी जिथं होतास तिथंच आहेस, अडकून पडला आहेस लौकिकाच्या बेडीत, फसला आहेस कीर्तीच्या मायेत. तुझ्या तपाचा भंग झाला आहे. मला हे अपेक्षित नव्हतं तुझ्याकडून – पंडित जागा हो. भानावर ये. दूर पळ या मेनकेपासून विश्वासमित्रासारखा.... अजून वेळ गेलेली नाही.

रागिणीची आकृती हळूहळू विरून गेली. पंडितराव भानावर आले. एखाद्या भयानक दिवास्वप्नातून जागे झाल्यासारखे. काही एक निश्चय करून ते उठले.

आजची नागपूरची बैठक त्यांना रद्द करायची होती. या लौकिक दुनियेपासून दूर जायचे होते. रागिणीचं दुःख दूर करायलाच हवं होतं. त्यांची लाडकी रागिणी रूसली होती. दुखावली होती. तिला आनंदी करायलाच हवं होतं. आपल्या तपात आणखी पुढं जाऊन, पुढं जात राहून, बस्स !

ते लॉजवर परतले. अन् कार्यकर्त्यांचा, गराडाच त्यांच्या भोवती पडला. पंडितरावांनी आजची बैठक रद्द करण्याचा मनोदय व्यक्त करताच त्यांची कावकाव सुरू झाली. सारी तिकिटे विकली गेली होती. अन् पब्लिक अनावर झाली होती. कार्यक्रम रद्द झाला तर दंगा माजण्याचा संभव होता. त्यांच्या सचिवाने मग सारी सूत्रे हातात घेतली. पंडितरावांना कार्यक्रम करण्याशिवाय सुटका नाही हे त्यानं आर्जवी शब्दात समजावून दिलं. इथलाच नव्हे तर येत्या चार महिन्याचे कार्यक्रम ॲडव्हांस घेऊन बुक झाले होते.

नाईलाजाने पंडितराव कार्यक्रमास तयार झाले. हृदयात एक जाळणारी आग वागवत त्यांनी गायन सुरू केले. यांत्रिकपणे ! रागिणीचा अतीव दुःखानं भरलेला चेहरा त्यांच्या मनःचक्षुसमोरून हटत नव्हता.

त्यांनी आपलं गाणं मध्यंतरापर्यंत कसं तरी रेटलं. गाण्यात रंग भरत नाहीये हे आज सर्वांच्या लक्षात येऊ लागलं. कार्यकर्त्यांची चुळबुळ सुरू झाली. त्यांची कुजबुज बुवांच्या कानावर मध्यंतराच्या वेळी आली. बुवा अस्वस्थ

झाले.

एका हुशार कार्यकर्त्याच्या लक्षात सारी परिस्थिती आली. बुवा मनाविरूद्ध गात असल्याचं त्याच्या ध्यानात आलं. बुवा अधुनमधून थकवा दूर होण्यासाठी मद्य घेतात हे त्याला माहीत होतं. केवळ तजेला येण्यासाठी म्हणून!

त्यानं लगेच व्यवस्था केली अन् हळूच पंडितरावांसमोर ग्लास नेऊन ठेवला. भीतभीत. पंडितराव क्षण दोन क्षण कचरले. त्यांनी सभोवार पाहिलं. खोलीत कुणीच नव्हतं. तरी हात धजेना पुढं – दारू पिऊन त्यांनी आजवर कधीच गाणं विटाळलं नव्हतं. पूजा नासवली नव्हती. पण आजवर गाणं रंगलं नाही असंहि कधी झालं नव्हतं. इतक्या दिवसांची कीर्ती, लौकिक ओसरण्याचा धोका निर्माण झाला होता..... पुढं अजून चार महिन्याचे कॉन्ट्रक्टस् पूर्ण करायचे होते.... गाणं बिघडून चालणार नव्हतं.

मद्याच्या पेल्यात आजवरचा लौकिक उसळत होता. दुसरीकडे रागिणीचे अश्रू साद घालत होते, एक क्षण मनाची घालमेल झाली. दुसऱ्याच क्षणी मद्याचा पेला उचलला गेला. एकदा, दोनदा, तीनदा, मन:पटलावरून रागिणीचं मूख पुसून जाईपर्यंत.....

कॉफीचा कप रिकामा करून बुवा उठले अन् आपल्या तसबीरीकडे दुर्लक्ष करून व्यासपीठाकडे चालू लागले. ते स्टेजवर येताच हजारो श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

त्यांना अभिवादन करून पंडितराव बैठकीवर बसले. तंबोरा हाती घेऊन त्यांनी त्यावर बोटं फिरवायला सुरुवात केली. एकवार तबलजीकडे पाहून घसा खाकरला अन् डोळे मिटून षड्ज लावला....

सेक्रेटरीने आनंदाने सुटकेचा निश्वास टाकला. स्वरसम्राट पंडितराव श्रोत्यांच्या मनावर परत राज्य करू लागले.... नेहमीप्रमाणे.... रागिणीचे अश्रू दारूच्या पेल्यात बुडवून.

---